# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 23/02/2023 (गुरूवार) दुपार

---

## चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील हल्दीराम कंपनी गुमथळा येथे दिनांक २१/०२/२०२३ चे ११:५० वा. ते दिनांक २२/०२/२०२३ चे ००.५० वा. दरम्यान यातील आरोपी नामे– १) साजनसिंग बलवंत सिंग, २) सरताज नसिर अहमद ३) बिरपाल बरविर सिंग ४) सोनू राजाराम लोधी सर्व रा. गूमथळा ता. कामठी जि. नागपूर यांनी आपले ताब्यातील निळया रंगाचा फार्म ट्रॅक्टर व स्लाईडर ट्रॉली मध्ये हल्दीराम कंपनीमधील कसाना टु साईटवरिल लोहा सरिया चोरून विना नंबरच्या निळया ट्रॅक्टरच्या स्लाईडर ट्रॉलीमध्ये ८ MM, १० MM, १२ MM, २० MM अंदाजे १४ फुट लांब लोहा सरिया अंदाजे वजन ४ टन अंदाजे किंमती १,२०,०००/–रुपयाचा मुद्देमाल व निळया रंगाचा फार्म ट्रॅक्टर व स्लाईडर ट्रॉली अंदाजे किंमती २,०००००/–रु असा एकूण ३,२०,०००/–रुपयाचा मूद्देमाल चोरून घेवुन जातांना मिळून आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– चंदु विठ्ठल श्रीरामे, वय ४० वर्षे, रा. गुमथळा ता. कामठी जि. नागपूर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ३४ भा.द.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भगवान चांदेवार ब. नं. ४४२ पो. स्टे. मौदा हे मो. नं. ९७६५२२१११६ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कुही** :– अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा सिल्ली येथे दिनांक २०/०२/२०२३ चे २२.०० वा. ते दि. २२/०२/२०२३ चे २०.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे– दयाराम तुळशीराम भिवगडे, वय ४३ वर्षे, रा. सिल्ली ता. कुही जि. नागपुर यांचे कपाटातील ठेवलेले जुने वापरते ३ ग्रॅम सोन्याची नथ, २ ग्रॅम सोन्याची नथ, ६ ग्रॅम सोन्याची नथ, १ ग्रॅम सोन्याची बारी, १ ग्रॅम सोन्याची अंगठी, १०० ग्रॅम चांदीचा कडा सोने चांदी कींमती अंदाजे ३२०००/–रू चा मुद्देमाल व नगदी ३५००/– रू असा एकुण ३५०००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३८० भा.द.वि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देविदास ठमके पो.स्टे. कुही मो. नं. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**